

# पालकांना पत्र

प्रिय पालक

तुम्ही तुमच्या मुलांच्या अभ्यासाबाबत जागरूक असालच परंतु त्याच बरोबर त्याचं चारित्र्य घडवण्याबाबतही तुम्ही प्रयत्नशील असावे यासाठी हा पत्र प्रपंच ! त्यांच्या पुढील शिक्षणाविषयी तुम्हाला काळजी असेलच परंतु येणाऱ्या काळातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी त्यांच्यातील कौशल्यविकास, प्रगतीकारक सवयी व एकूणच व्यक्तिमत्वाची जडण घडण याविषयीसुद्धा तुम्ही आताच पावले उचलावीत यासाठीसुद्धा हा पत्ररूपी संवाद ! मुलांनी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात यशस्वी व्हावे अशीच तुमची इच्छा असेल परंतु कधीतरी प्रत्येकाच्या वाट्याला येणारे एक सत्य–अपयश पचवायलाही त्यांना तयार करावं व त्यासाठी तुम्हीच आधी स्वतः तयार असावं यासाठीच हे हितगूज ! याशिवाय मार्कांबरोबर त्या त्या विषयांच्या ज्ञानाचा व्यवहारात उपयोग करण्याची क्षमता अंगी येणं हे जास्त महत्वाचं आहे, तोच शिक्षणाचा मूळ हेतूसुद्धा आहे. अन्यथा घोकंपट्टी करून मिळवलेलं शिक्षण व्यवहारी जगात व नोकरी मिळवायला पुरेसं ठरत नाही आणि मग शिक्षण भरपूर आहे पण नोकरी नाही अशी दयनीय अवस्था आज आपल्याच आजूबाजूला बघायला मिळते. तेव्हा आतापासूनच सावधान !

खरं तर जन्माला येणारी प्रत्येक व्यक्ती काहीतरी खास वैशिष्ट्य आपल्याबरोबर घेऊन येत असते. ते ओळखून त्याला चालना दिली तर आपली मुलं अद्वितीय कामगिरी करू शकतात. परंतु त्यांची ती वैशिष्ट्य गुंडाळून ठेऊन आपणच दुसऱ्यांशी तुलना करून त्यांना इतरांप्रमाणे काहीतरी बनायला भाग पाडतो. मग सर्वजण तोच कित्ता गिरवतात आणि तिथूनच स्पर्धेला सुरुवात होते. पुढे ती मार्कांच्या शर्यतीचं रूप धारण करते. जास्तीचं शिकायला काही मनाई नसावी परंतु महागडा क्लास लावला म्हणजे आपली मुलं शिक्षणात तरबेज होऊन त्यांचं भावी आयुष्य सुरक्षित होईलच असा भाबडा समज आपण बाळगून असतो. परंतु तसे घडतेच असे नाही. त्यासाठी मुलांकडे वैयक्तिकरित्या लक्ष घालून ती योग्य दिशेने जातायत ना हे बघणं आज जास्त गरजेचं झालं आहे. स्पर्धा असावी परंतु स्वतःशी, प्रत्येक दिवस आपल्यात सुधारणा व्हावी, महिन्यागणिक व वर्षागणिक स्वतःचा कल ओळखून एखाद्या विषयात पारंगत झालो तर आपल्याला कोणी स्पर्धकच उरत नाही. आपण केलेल्या कामाला स्कोप राहतो. स्कोप आय. टी. किंवा इतर क्षेत्रात बाहेर नसतो तर तो आपणच निर्माण करायचा असतो. म्हणूनच ज्याला आपण सर्वात शेवटी प्राधान्य देतो ते आर्टस् झालेले ग्रॅज्युएटस् कलेक्टर झाल्याची कित्येक उदाहरणे बघायला मिळतात.

आज संपूर्ण जग जवळ आलंय, संधींना नुसता ऊत आलाय आणि माहितीचा तर पूर लोटलाय. परंतु यातून नेमकं आपल्या कामाचं काय हे जर कळलं नाही तर या पुरात वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. इंटरनेट म्हणजे माहितीचंच नाही तर मोह–मायेचं जाळं आहे. इंटरनेट, फेसबुक, स्मार्ट फोन व त्यातील ॲप्स यांचा वापर काळजीपूर्वक करण्याची शिकवण मुलांना दिली नाही तर त्यांची आयुष्ये बरबाद होण्याचीच शक्यता जास्त आहे. मुलांना स्मार्ट फोन देण्याआधी त्यांचा वापर त्यांच्या सोयीसाठी, गरजेपुरता, प्रगतीसाठी व्हावा इतकं स्मार्ट त्यांना करायला हवं आणि त्यासाठी आपणही तितकेच स्मार्ट पालक बनायला हवेत, नाही का ? मूळात मुलांना काय आणि आपणही काय नाही म्हणायला शिकायला पाहिजे. प्रगतीच्या आड येणाऱ्या प्रत्येक गोष्टीला, वाईट सवयीला, अविचारांना नाही म्हणायला शिकवायला हवं. आणि कोणतीही गोष्ट मुलांना शिकवायची अत्यंत प्रभावी पद्धत म्हणजे स्वतः ती गोष्ट आपण आचरणात आणणं. मग मुलं ती गोष्ट आपोआपच शिकतात. मुलांच्या प्रत्येक मागणीला होकार न देता गैरवाजवी मागण्यांना नकार देण्याची व मुलांना नकार ऐकण्याची सवय आपण सर्वांनीच लावायला हवी. तेच सगळ्यांच्या हिताचं आहे. त्यातूनच शिस्त लागते, मनावर ताबा मिळवण्याची सवय लागते व शेवटी मुलांवर त्याचे चांगले संस्कार घडतात. त्यानेच पुढील आयुष्यात येणाऱ्या प्रलोभनांवर विजय मिळवण्याची क्षमता त्यांच्यात येते.

विज्ञान–तंत्रज्ञान आज शिखरावर पोहोचले आहे. त्याद्वारे जीवन सुखदायी करणाऱ्या मुबलक सोयी–सुविधा आहेत. परंतु माणूसपण कुठेतरी हरवत चाललंय. पैशासाठीच सर्व काही हि भावना वाढीस लागते आहे. काही जण म्हणतात, 'पैसा खुदा तो नहीं, पर खुदासे कम भी नहीं.' म्हणजे परमेश्वरानंतर पैशाचाच त्यांनी नंबर लावून टाकलाय. खरं तर पैसा आपल्यासाठी कि आपण पैशासाठी एवढा साधा आणि सोपा विचार केला तर आपल्या जीवनात असणाऱ्या पैशाहून कितीतरी पट मौल्यवान गोष्टी दिसतील आणि त्याच जास्त महत्वाच्या आहेत. त्या मिळवण्याचं साधन फक्त पैसा आहे असं फार तर आपण म्हणू शकतो. केवळ नोकरी आणि पैसा मिळवण्याचं साधन म्हणून शिक्षणाकडे बघीतलं तर शिक्षणाच्या मूळ हेतूलाच आपण तिलांजली देत असतो.

आज पुढे जाण्याच्या चढाओढीत नीतिमूल्ये मागे पडताहेत, म्हणूनच देशात भ्रष्टाचार, स्त्रियांवरील अत्याचार दिवसागणिक वाढत चाललेत. आपली मुलं अजाण असतील त्यांना यासर्व गोष्टींची जाणिव करून द्यायची जबाबदारी पालक म्हणून आपलीच नव्हे काय ? समाजातील वाईट कृत्ये घडवणारे कुठून दुसऱ्या ग्रहावरून येत नाहीत तर आपल्यातीलच व्यक्ती असतात. कदाचित आपल्याच किंवा फार तर बाजूच्यांच्या घरातील असतील. मग याला जबाबदार कोण ? आपणच की ! पालकत्वाची जबाबदारी खूप मोठी आहे. मला माफ करा परंतु इतर प्राणी आणि माणसांत हाच काय तो फरक आहे ! भविष्यातील घडणाऱ्या अप्रिय घटना घडायच्या नसतील तर तशी पिढी घडवण्याची जबाबदारी तुम्हा–आम्हालाच उचलावी लागेल. त्यासाठी शुभस्य शिघ्रम. नीतिमूल्ये व व्यक्तींचा आदर करायला आपल्या मुलांना शिकवायला हवे. तेच खरं शिक्षण जे त्यांच्या आयुष्यभर कामी येईल. असे शिक्षणच त्यांना शास्वत व सर्व कल्याणकारी यश मिळवून देईल.

अजून एक अत्यंत महत्वाचा मुद्दा मला मांडायचा आहे. आपला स्वतःकडे बघण्याचा, इतरांकडे, परिस्थितीकडे आणि जगाकडे बघण्याचा दृष्टीकोनच सगळी गणिते बदलून टाकतो. त्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन हि अतिशय छान संज्ञा वापरली जाते. दुर्दैवाने आपल्या वातावरणातच नकारात्मकता जास्त भरली आहे. आपणही मुलांवर ते काय करू शकतात या ऐवजी काय करू शकत नाही हेच जास्त बिंबवत असतो. काय करावे यापेक्षा काय करू नये हेच सतत सांगत असतो, नाही का ? आपलं प्रत्येकाचंच मन कॉम्प्युटर सारखं काम करत असतं. आपण म्हटलं कि हे मला शक्य नाही तर खरंच ते शक्य होत नाही. परंतु याच्या उलट, परिस्थिती काहीही असो परंतु आपण म्हटलं कि हे मला शक्य आहे तर आपण वाट्टेल ते करून ते खरं करण्याचा प्रयत्न करतो आणि शेवटी त्यात यशस्वीसुद्धा होतो. हे अगदी उदाहरणानिशी अनेकदा सिद्ध झालंय की सकारात्मक मन–विचार जादूच्या कांडीप्रमाणे काम करतात. आपण आपल्या मनाची ताकद ओळखायला शिकलं पाहिजे आणि मुलांनाही हे शिक्षणासोबतच शिकवलं पाहिजे. जगाचं ज्ञान तर हवंच पण त्यासोबत स्वतःची–मनाची ओळखही व्हायला हवी !

कराल ना एवढं तुमच्या मुलांसाठी ? त्यांच्या–तुमच्या–आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि मानवजातीच्या कल्याणासाठी ? मला खात्री आहे तुम्ही नक्की कराल ! त्यासाठी माझ्याकडून अनेकानेक शुभेच्छा !

मुलांचा आणि तुमचाही हितचिंतक

**भारुकाका**

मो. ९३२१५५०२८६ ई मेल : info@bharukaka.com वेबसाईट : www.bharukaka.com

**महेंद्र बैसाणे** (मुंबई विभागीय मंडळाद्वारे परीक्षांदरम्यान नियुक्त कौन्सेलर)